संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# बिबट्या, पक्षप्रवेश आणि राजकीय जुगार

**राजकारणामध्ये** अनेक गोष्टी जशा बेभरोशाच्या असतात. तशाच काही गोष्टी योगायोगाच्याही असतात. बेभरोशाच्या गोष्टी जेव्हा घडून येतात. त्यावेळी त्याला अनेक उपमा दिल्या जातात. चौकार, षटकार असे संबोधून त्या राजकीय घडामोडींचे कौतुक केले जाते. परंतु राजकारण हे बेभरोशाचेही चित्र असल्याने जे काही घडून येते ते टिकून राहीलच याची खात्री देता येत नाही. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसात निवडणुकीच्या तोंडावर ज्या काही घडामोडी घडत आहेत त्या अशाच बेभरोशाच्या म्हणाव्या लागतात. मग अगदी शरद पवारांनी माढा मतदारसंघातून निवडणुक लढवण्याची घोषणा केली आणि नंतर माघार घेत असल्याचेही जाहीर केले. त्यांची या घोषणेमागे अनेक राजकीय पैलू असू शकतील. परंतु आधी उभे राहण्याची घोषणा आणि नंतर निवडणूक लढवायला दिलेला नकार हासुध्दा बेभरोशाचाच प्रकार ठरतो. आता तर याच मतदार संघातील विजयसिंह मोहिते पाटील यांचे चिरंजीव हेही भाजपात जाण्याची तयारी करीत आहेत. त्यापूर्वी विरोधी पक्ष नेते असलेल्या राधाकृष्ण पाटलांचे सुपुत्र भाजपाच्या गळाला लागले. या दोन्ही घटना त्या त्या काँग्रेससाठी तशाच बेभरोशाच्या ठरतात. वर्षानुवर्षे काँग्रेसमध्ये राहिलेले अनेक प्रकारचे पदं आणि सन्मान मिळवलेल्या नेत्यांची मुलंसुध्दा पक्षाला राम राम ठोकून बाहेर पडतात तेव्हा राजकारणाचाच काही भरोसा उरला नसल्याचे सिध्द होते. विखे पाटलांचे चिरंजीव सुजय विखेपाटील यांचा भाजप प्रवेश म्हणजे मुख्यमंत्र्यांसाठी दिवाळी दसरा असल्यासारखेच चित्र होते. साधुसंत येती घरा. तोचि दिवाळी दसरा. ही उक्ती भक्तिमार्गासाठी योग्य असली तरी इतर नेते येती पक्षा तोचि विजयाची आशा अशी भाजपाची सध्या परिस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांनी इतक्या उत्स्फूर्तपणे सुजय विखे पाटलांचे स्वागत केले की आता भाजपाला लोकसभेच्या ४८ च्या ४८ जागा मिळाल्यासारखे त्यांना वाटत होते. सुजय विखे पाटलांना भाजपात आणून मुख्यमंत्र्यांनी चौकार षटकार ठोकल्याचेही बोलले गेले. असे बोलणारे एकतर त्यांचे हितचिंतकच असू शकतात. कारण राजकारणात कधीही चौकार षटकार ठोकता येत नाहीत जिथे हल्ली क्रिकेटमधला चौकार, षटकार हासुध्दा एक जुगार असतो. तिथे राजकारणातल्या घटना सत्तेच्या सारीपाटावरचाच जुगार ठरतो.

### बेभरोसा आणि योगायोग

या सगळ्या बेभरोशाच्याच राजकीय खेळ्या असतात. असे बरेच डावपेच पुढच्याकाही दिवसात होत राहातील. आता यातला योगायोगाच्याही अनेक घटनांचे वर्णन करता येऊ शकते. राजकारणाशी संबंध नसलेली पण त्याच काळात आणि त्याच मतदार संघात घडलेली घटना आपोआपच योगायोग म्हणून गृहित धरावी लागते. ज्यादिवशी सुजय विखे पाटील यांचा भाजपा प्रवेश सोहळा रंगला होता त्याच दिवशी त्याच प्रवरानगरच्या किंबहुना विखे पाटलांच्याच मालकीच्या तिथल्या मेडिकल कॉलेजमध्ये एक बिबट्या घुसला होता. जो काही हैदोस घालायचा तो त्यांनी घातला तिथल्या चार कर्मचाऱ्यांनाही त्याने जखमी केले आणि त्याचवेळी प्रवरानगरचे हे सुपुत्र भाजपामध्ये घुसले होते. या घटनेचा राजकारणाशी काही संबंध येत नाही. परंतु प्रवरानगरमधलीच घटना असल्यामुळे आणि एकाच दिवशी त्या घडल्यामुळे हा योगायोगच समजावा लागतो. राजकारणात इकडून तिकडे फिरणारे नेते सत्तेचे सावज टिपायलाच फिरत असतात. हे मात्र नाकारता येणार नाही. प्रवरेच्या पक्षप्रवेशाचे हे प्रवचन पुढे अनेक दिवस रंगत राहील. दुसरा योगायोग म्हणजे पाकिस्तानच्या भूमीत घुसून भारताने हवाई हल्ले केले त्याचा राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न भाजपाकडून झाला. तरीदेखील एकूण भाजपाच्या संख्येमध्ये फारशी वाढ होत नाही. अशी चिन्हे दिसू लागली. एकीकडे ही परिस्थिती असतानाच महाराष्ट्रात पवारांनी माढा मतदार संघातून माघार घेणे आणि सुजय विखे पाटील यांचे पक्षात येणे या गोष्टी भाजपासाठी योगायोगासारख्याच घडून आल्या आहेत. बुडत्याला काडीचा आधार या म्हणीप्रमाणे या दोन्ही घटनांनी भाजपाला दिलासा देण्याचे काम केले आहे. निवडणुकीच्या तोंडावर जेव्हा असे प्रकार घडतात तेव्हा त्यामागचा राजकीय खेळ हा लोकांसाठी जरी चर्चेचा विषय ठरत असला तरी राजकारण्यांसाठी तो स्वतःच्या भवितव्याचा विषय असतो. कदाचित म्हणूनच सर्व प्रकारचे प्रयत्न करून सुजय विखेंनी आपला भाजप प्रवेश घडवून आणला असावा.

### अवाढव्य खर्च

हा सगळा घटनाक्रम राजकारणातील अविश्वास शिवाय योगायोगाने घडून येणाऱ्या प्रसंगांची साखळी दाखवतो. परंतु त्याचा अंतिम निष्कर्ष काढला तर हे सगळे प्रकार केवळ जुगार म्हणूनच वर्णन करावे लागतात. आणि ज्याच्याकडे पैसा आहे. तोच यशस्वीपणे जुगार खेळू शकतो. सध्या राजकारणाची परिस्थिती अशीच आहे त्याचे आपण कितीही कौतुकाने वर्णन केले किवा राजकारणाचा संबंध लोकशाहीशी जोडून त्याची समाजकारण आणि राजकारणाशीही तुलना केली तरी ती आपलीच फसवणुक ठरू शकते. कोणत्याही तत्वांची आणि विचारांची चाड नसलेले हे क्षेत्र एकूण समाजजीवनाचा इतका मोठा भाग व्यापते. हे दुर्दैव म्हणायला हवे. केवळ या निवडणुक नावाच्या राजकीय प्रयोगाकरीता केला जाणारा प्रचंड खर्च त्यासाठी खर्च होणारा वेळ अक्षरशः लाखो सरकारी कर्मचाऱ्यांची पणाला लागणारी शक्ती आणि त्यातून अंतिमतः हाती लागणारे निष्कर्ष हे खूपच निराशाजनक म्हणावे लागतात. केवळ सत्तेच्या जुगारासाठी एवढा मोठा खटाटोप केला जातो. ही गोष्ट काही लोकशाहीच्या सन्मानाची म्हणता येत नाही राजकारणातली ही अविश्वासाची परिस्थिती दूर होईल आणि हा अवाढव्य खर्च टाळून आदराने आणि सन्मानाने सहजगत्या आपापले लोकप्रतिनिधी निवडण्याची सहज सोपी प्रक्रिया ज्यावेळी घडून येईल त्यावेळी खऱ्या अर्थाने लोकशाहीचे मूल्य प्रस्थापित झाले असे म्हणता येईल. तोपर्यंत या निवडणुका आणि त्याभोवती फिरणारे राजकारण केवळ जुगाराचाच भाग म्हणावा लागेल.